# विद्यार्थी उत्कर्ष मंडळ, मुंबई

(नोंदणी क्र. इ/३३६१/मुंबई पी-टी ॲक्ट अन्वये स्थापना १९५४)

**११९, आनंद इस्टेट, दुसरा मजला, साने गुरूजी मार्ग, मुंबई - ४०० ०११. दूरध्वनी : २३०९ ८४६२**

**वेबसाईट : www.vummumbai.org   ईमेल : vum@vummumbai.org**

## एक नजर

| | | |
|---|---|---|
| स्थापना | : | १ एप्रिल १९५४ |
| मुख्य उद्दिष्ट | : | विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास. |
| सभासद संख्या | : | १०,००० पेक्षा जास्त |
| पदवीधर सदस्य | : | ७,००० पेक्षा जास्त (डॉक्टर, इंजिनीयर, आर्किटेक, खेळाडू, अभिनेते, चित्रकार, साहित्यिक व पत्रकार इ. चा समावेश) |
| संस्थेचे कार्यक्षेत्र | : | मुख्यत: मध्य मुंबईतील (गिरणगांव), चिंचपोकळी, सातरस्ता, भायखळा, लालबाग, ना. म. जोशी मार्ग, माझगांव व परळ या विभागात विखुरलेले आहे. |
| सदस्य पात्रता | : | इयत्ता ५ वी व त्यावरील इयत्तेत शिकत असलेला विद्यार्थी/विद्यार्थीनीस फक्त १ रूपया भरून आजीव सभासद होता येते. |
| शैक्षणिक कार्यक्रम | : | १) सर्व विभागात प्रत्येकी २ वर्गाप्रमाणे ५ अभ्यासिका दररोज ६ त ९ या वेळेत साधारण ५०० ते ७०० विद्यार्थी लाभ घेतात.<br>२) गरीब, होतकरू व गरजू विद्यार्थ्यांसाठी पुस्तक पेढी (इयत्ता ८ वी ते १२ वी च्या १२५ ते १५० विद्यार्थ्यांना दरवर्षी परतफेडीच्या अटीवर पुस्तक संचाचे वाटप)<br>३) विभागातील प्रत्येक जण संगणक साक्षर व्हावा या हेतूने अल्प फी आकारून आद्यायावत प्रशिक्षण देणारी संगणक अकादमी चालविली जाते.<br>४) अभ्यास मार्गदर्शन वर्ग<br>५) वार्षिक संमेलनात गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार.<br>६) शैक्षणिक संदर्भ ग्रंथालय (बी.ए.,बी.कॉम्.,बी.एस्सी.,मेडीकल,इंजिनिअरींग,लॉ व स्पर्धात्मक परीक्षेची पुस्तके उपलब्ध)<br>७) शैक्षणिक शिबीर |
| क्रीडा कार्यक्रम | : | आंतरविभागीय स्पर्धा. |
| कला विभाग | : | सभासदांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून आंतरविभागीय एकांकिका स्पर्धा, नाटक, लेखन, प्रत्यक्ष निर्मिती |
| प्रणाम हस्तलिखित | : | विद्यार्थ्यांमध्ये निबंध, लेख, चित्रे, कथा, कविता व साहित्य याविषयी आवड निर्माण व्हावी म्हणून विद्यार्थ्यांचे हस्तलिखित प्रकाशित करण्यात येते. |
| महापुरूषांचे स्मरण | : | १) लोकमान्य टिळक पुण्यतिथी (१ ऑगस्ट)   २) विवेकानंद जयंती (१२ जानेवारी)<br>३) शिवजयंती (१९ फेब्रुवारी) |
| बौद्धिक कार्यक्रम | : | १) विवेकांनद व्याख्यानमाला - १९५८ पासून समाज प्रबोधन व ज्ञानदान देण्याचा वसा, अनेक नामवंत वक्त्यांची निरनिराळ्या विषयांवर व्याख्यानसत्र (नोव्हेंबर दरम्यान) आयोजित केली जातात.<br>२) कार्यकर्ता अभ्यासवर्ग - कार्यकर्त्यांसाठी अभ्यासवर्ग भरविले जातात. तसेच विभागश: कोजागिरी पौर्णिमा साजरी केली जाते. |
| पावसाळी सहल | : | विभागश: पावसाळी सहली आयोजित करून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढीस लागण्यासाठी प्रयत्न केले जातात. |
| वार्षिक शिबीर | : | डिसेंबर दरम्यान शिबीर आयोजित करून अनेक विषयांवर परिसंवाद, चर्चा, बौद्धिके होतात. निर्सगाच्या सानिध्यात तीन दिवस परिसर भ्रमण, अभ्यास वर्ग |
| प्रदीर्घ व ताळेबंद बैठक | : | वर्षाच्या सुरूवातीस कार्यक्रमाचे अंदाजपत्रक सादर करणे व शेवटी अहवाल वाचन. |
| वर्धापन दिन, शपथविधी | : | गुढीपाडवा, वर्धापनदिन व पदाधिकारी, संघटक यांचा शपथविधी सोहळा |
| साप्ताहिक व विभागश: बैठका | : | आठवड्याभरातील कार्यक्रमाचे आखीव-रेखीव नियोजन करण्यासाठी शुक्रवारी साप्ताहिक बैठका व प्रार्थना. |
| समर्थ ग्रंथालय | : | विभागातील साहित्यप्रेमींची वैचारिक भूक भागविण्यासाठी सुसज्ज असे निरनिराळ्या लेखकांच्या कथा, कादंबऱ्या याने विपुल असलेले ग्रंथालय, वाचक मेळावा, परिसंवाद आयोजित केला जातो. |
| सामाजिक कृतज्ञता | : | नैसर्गिक आपत्तीप्रसंगी दानशूरांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, गणवेश वाटप, |
| आर्थिक | : | शारदास्मृती, विवेकानंद स्मृती, विवेकांनद व्याख्यानमाला (पासेस विक्री) देणग्या, मंडळ निधी समर्पण सोहळा इ. |

# विद्यार्थी उत्कर्ष मंडळ, मुंबई

(नोंदणी क्र. इ/३३६१/मुंबई पी-टी ॲक्ट अन्वये स्थापना १९५४)

**११९, आनंद इस्टेट, दुसरा मजला, साने गुरूजी मार्ग, मुंबई - ४०० ०११. दूरध्वनी : २३०९ ८४६२**

## घटना

संस्थेचे नाव : १) संस्थेचे नांव विद्यार्थी उत्कर्ष मंडळ (मुंबई) असे राहील

संस्थेचे व्यावसायिक वर्ष : २) संस्थेच्या कामकाजाचे वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे राहिल

भाषा : ३) संस्थेचे कामकाज व पत्रव्यवहार शक्यतो मराठीतून चालेल.

कचेरी : ४) संस्थेची मुख्य कचेरी मुंबई येथे राहील.

कार्यक्षेत्र : ५) जरूरीप्रमाणे मंडळाच्या शाखा उघडण्यात येतील व त्यावर मुख्य कचेरीचे नियंत्रण राहील.

ध्येय : ६) विद्यार्थ्यांचा सर्वांगीण उत्कर्ष घडवून आणणे हे संस्थेचे ध्येय राहील.

कार्यक्रम : ७) संस्थेचे कार्यक्रम पुढील प्रमाणे राहतील.

क) विद्यार्थ्यांना संघटीत करून परस्पर सहकार्याने विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडविणे.

ख) विद्यार्थ्यांच्या मनावर चांगले परिणाम घडवून आणण्यासाठी राष्ट्रीय व तत्सम कार्यक्रम घडवून आणणे.

ग) विद्यार्थ्यांचा बौद्धीक, मानसिक व शारीरिक विकास घडवून आणणे.

ध) विद्यार्थ्यांच्या उत्कर्षासाठी व त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी जनजागृति करणे.

ड) विद्यार्थ्यांना विधायक कार्यासाठी प्रवृत्त करणे.

च) योग्य व लायक विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य करणे.

छ) समाजाच्या उन्नतीसाठी झटणे.

ज) विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या कलागुणांचा विकास करणे.

झ) संस्थेच्या ध्येयास अनुरूप असे योग्य कार्यक्रम घडविणे.

सभासद : ८) क) संस्थेचे ध्येय व कार्यक्रम मान्य असणाऱ्या विद्यार्थी दशेतील कुठल्याही व्यक्तीस ठराविक प्रवेश शुल्क भरून सभासद होता येईल.

ख) वरीलप्रमाणे सभासद झालेल्या व्यक्तीची विद्यार्थी दशा संपली असताही त्याचे सभासदत्व कायम राहील.

ग) मंडळाचे ध्येय व कार्यक्रम यांना बाधा आणणाऱ्या किंवा ते मान्य नसणाऱ्या सभासदांचे सभासदत्व काही काल किंवा कायमचे रद्द करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

सभासदांचे कर्तव्ये : ९) सभासदांच कर्तव्ये पुढीलप्रमाणे राहतील.

क) प्रत्येक सभासद संस्थेच्या कार्याशी एकनिष्ठ राहील.

ख) प्रत्येक सभासद संस्थेच्या नियमाचे पालन करून संस्थेचे ध्येय सिद्धीस नेण्याकरिता मनापासून झटेल.

ग) प्रत्येक सभासदाची वर्तणूक व शिस्त संस्थेच्या कार्याला साजेशी राहील व गैरवर्तन करणारा सभासद शिक्षेस पात्र ठरेल.

घ) मंडळाने ठरविलेला कार्यक्रम प्रत्येक सभासदावर बंधनकारक राहील.

कार्यकारी मंडळ : १०) मंडळाचे कार्यकारी मंडळ खालील पदाधिकाऱ्याचे असेल.

क) मंडळप्रमुख ख) उपमंडळप्रमुख ग) अर्थ प्रमुख घ) शिक्षण प्रमुख ड) ग्रंथालय प्रमुख

ज) हिशेब तपासणीस छ) प्रत्येक शाखेचा संघटक च) प्रत्येक शाखेचा सहसंघटक

झ) इतर जास्तीत जास्त १० कार्यकारी सदस्य

मतदार : ११) खालील व्यक्तींना मतदानाचा अधिकार आहे.

क) चालू वर्षीचे गटप्रमुख

ख) गेल्या वर्षीचे कार्यकारिणी सदस्य

ग) मंडळाच्या स्थापनेपासूनचे (सन १९५४ पासून मंडळप्रमुख व उपमंडळप्रमुख)

पान २ वर

घ) चालू वर्षी कार्यकारिणीत असलेले सदस्य.

टीप : १) वरील सर्व पदाधिकाऱ्यांनी संस्थेच्या कार्याचे जे वर्ष ठरविण्यात आले आहे त्या संपूर्ण वर्षभर वरीलपैकी कुठल्याही जागी काम केलेले असले पाहिजे.

२) गटप्रमुख म्हणजे संघटकाने शाखेच्या व्यवस्थेसाठी मंडळप्रमुखांच्या सल्ल्याने नेमलेला मदतनीस.

कार्यकारी मंडळाची निवड : १२) क) कलम ११ प्रमाणे मतदानास पात्र असलेले सभासद मंडळप्रमुख व उपमंडळप्रमुख यांची बहुमताने निवड करतील. मतदान गुप्त पद्धतीने होईल.

ख) वरीलप्रमाणे निवडून आलेले मंडळप्रमुख व उपमंडळप्रमुख इतर कार्यकारी पदाधिकाऱ्यांची व कार्यकारी सदस्यांची निवड करतील व नव्या कार्यकारी मंडळातील सभासदांची नावे सर्व सभासदांस जाहिर करतील.

ग) वरीलप्रमाणे तयार झालेले कार्यकारी मंडळ एक वर्ष अधिकार पदावर राहील.

कार्यकारी मंडळाची कामे : १३) क) कार्यकारी मंडळाची सभा आठवड्यातून कमीत कमी एकदा होईल.

ख) कार्यकारी मंडळ मंडळाचे कार्यक्रम आखील व घडवून आणील.

ग) कार्यकारी मंडळ निरनिराळ्या खात्याच्या अंदाज पत्रकास व खर्चास मंजुरी देईल.

ध) कार्यकारी मंडळ वर्ष अखेरील सर्व सभासदांची सभा घेऊन मंडळाच्या कार्याचा अहवाल व जमाखर्च सादर करील.

ड) कार्यकारी मंडळ वर्षअखेरीस पुढील वर्षासाठी मंडळप्रमुख, उपमंडळप्रमुख यांची निवडणूक घडवून आणील.

च) संस्थेच्या निरनिराळ्या कार्याच्या बाबीविषयी नियम बनविणे वा त्यात दुरूस्ती करणे याविषयीचे अधिकार कार्यकारी मंडळास राहातील.

सभेचे कामकाज : १४) क) सभेतील सर्व निर्णय बहुमताने घेतले जातील. परंतु मतांची संख्या समान झाल्यास मंडळप्रमुख योग्य निर्णय देतील.

ख) सभेचे कामकाज चालण्यासाठी१/३ सभासदांची अुपस्थिती आवश्यक लागेल. परंतु गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास १५ मिनिटांनी तीच सभा परत सुरू करण्याचा अधिकार मंडळप्रमुखास राहील

ग) सभेचे कामकाज मंडळप्रमुख चालवील.

कार्यकारी मंडळाचे घटक : १५) मंडळप्रमुख - मंडळप्रमुख हा मंडळाचा प्रमुख असेल.

ख) मंडळाच्या सर्व व्यवस्थेवर मंडळप्रमुखाचे नियंत्र राहील.

ग) मंडळप्रमुख मंडळाचे कार्यक्रम आखील व कार्यकारिणीची मान्यता घेऊन ते घडवून आणील.

घ) कामाच्या आवश्यकतेनुसार मंडळप्रमुख कार्यकारी मंडळाच्या किंवा सर्वसभासदांच्या सभा बोलविल.

उपमंडळप्रमुख : १६) क) मंडळप्रमुखास मंडळाच्या प्रत्येक कामात उपमंडळप्रमुख सहकार्य देईल.

ख) मंडळाच्या सर्व कागदापत्राचे दप्तर उपमंडळप्रमुखाकडे राहील

ग) मंडळप्रमुखाच्या अनुपस्थितीत मंडळप्रमुखाची सर्व कामे उपमंडळप्रमुख करील.

अर्थ प्रमुख : १७) क) अर्थप्रमुख हा मंडळाच्या आर्थिक विभागाचा प्रमुख राहून त्याचे सर्व आर्थिक व्यवहारावर नियंत्रण करील

ख) मंडळाचे सर्व आर्थिक व्यवहार अर्थप्रमुख मंडळप्रमुखाच्या सल्ल्याने करील.

शिक्षण प्रमुख : १८) शिक्षण प्रमुख शैक्षणिक दृष्टिकोनातून मंडळाच्या ध्येयास अनुरूप असे कार्यक्रम आखील व कार्यकारी मंडळाची मंजुरी घेऊन ते घडवून आणील.

हिशेब तपासनीस : १९) अर्थप्रमुखाने तयार केलेले हिशेब तपासून त्याबाबतचा अभिप्राय हिशेब तपासणीस कार्यकारी मंडळास सादर करील.

ग्रंथालय प्रमुख : २०) क) ग्रंथालय प्रमुख ग्रंथालयाच्या सर्व व्यवहारास जबाबदार राहिल.

ख) ग्रंथालयाच्या प्रगतीसाठी मंडळाने ठरविलेले कार्यक्रम व नियम ग्रंथालय प्रमुख अंमलात आणील.

संघटक : २१) क) संघटक हा मंडळाने ठरविलेल्या विभागाचा प्रमुख राहिल.

ख) मंडळाच्या ध्येयास अनुरूप असे संघटनात्मक कार्यक्रम संघटक मंडळप्रमुखाच्या संमतीने घडवून आणील.

ग) संघटक कार्यकारी मंडळाने ठरविलेले कार्यक्रम अंमलात आणील.

सह संघटक : २२) क) सहसंघटक संघकास त्याच्या कार्यात सहकार्य देईल.

ख) संघटकाच्या अनुपस्थितीत संघटकाची कामे सहसंघटक करील.

कार्यकारी सभासद : २३) मंडळप्रमुखाने वेळोवेळी सुपूर्द केलेली कामे कार्यकारी सभासद करतील.

घटना दुरूस्ती अथवा स्पष्टीकरण : २४) क) घटनेत बदल, दुरूस्ती अथवा नवीन तरतूद मतदारांच्या सभेत २/३, मतांनी करता येईल

ख) घटनेच्या कुठल्याही कलमासंबंधी वाद निर्माण झाल्यास त्यासंबंधी मतदारांच्या सभेत बहुमताने निर्णय घेण्यात येईल (मतांची संख्या समान झाल्यास मंडळप्रमुख योग्य निर्णय देईल.)